# प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/२५९४०/२०२३-२४/दिनांक ३१/०७/२०२३
अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॉट ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ४११०३०.

दि. २६-९-२०२६

## वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा वार रविवार दि. १३-९-२०२६ रोजी सकाळी ११ वा. संस्थेच्या आवारामध्ये आयोजित करण्यात आली होती.

तथापि, सदर सभेच्या सुरुवातीस पोटनियमानुसार आवश्यक असणारा कोरम पूर्ण नसल्याने मा. अध्यक्ष श्री. केदार निकम यांनी सदरची सभा कोरम अभावी अर्ध्या तासासाठी तहकूब करणेत येत आहे असे जाहिर केले व सदरची सभा याचठिकाणी अर्ध्यातासानंतर भरेल त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही. अर्ध्यातासानंतर मा. अध्यक्ष यांनी सभेचे कामकाज सुरु करणेबाबत मा. सचिव यांना कार्यपत्रिकेवरील विषय घेण्यास सांगितले त्याप्रमाणे मा. सचिव श्रीमती. वासवी बक्षी यांनी कार्यपत्रिकेवरील विषय घेण्यास सुरुवात केली.

| | |
|---|---|
| विषय क्र. १ | मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे |
| ठराव क्र. १ | मागील सभेचा इतिवृत्तांत मा. सचिव यांनी वाचून दाखविला व सदरचा इतिवृत्तांत उपस्थित सभासदांनी कायम करण्याचे ठरविले<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. अशोक साळुंके अनुमोदक : श्री. अनिल जोंधळे |
| विषय क्र. २ | दि. ०१-०४-२०२५ ते दि. ३१-०३-२०२६ या कालावधीच्या आर्थिक हिशोब पत्रकास मंजूरी देणे. |
| ठराव क्र. २ | दि. ०१-०४-२०२५ ते दि. ३१-०३-२०२६ या कालावधीच्या आर्थिक हिशोब पत्रकाबाबत सादक बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. महेश झगडे अनुमोदक : श्री. विष्णु जगताप |
| विषय क्र. ३ | दि. ३१-०३-२०२६ अखेरच्या लेखापरिक्षणाचा अहवालाची नोंद घेणे. |

| | |
|---|---|
| ठराव क्र. ३ | दि. ३१-०३-२०२६ अखेरच्या लेखापरिक्षणाचा अहवाल उपस्थित सभासदांनी निरिक्षण करुन त्याबाबत साधक बाधक चर्चा करून नोंद घेण्यात आली व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. तुषार ब्रह्मे अनुमोदक : श्री.उमेश लाड |
| विषय क्र. ४ | दि. ०१-०४-२०२६ ते ३१-०३-२०२७ या कालावधी करिता लेखापरिक्षकाची नेमणूक करणे. |
| ठराव क्र. ४ | दि. ०१-०४-२०२६ ते ३१-०३-२०२७ या कालावधी करिता लेखापरिक्षकाची नेमणूक करणेबाबत चर्चे अंती मा. सहकार खात्याकडील ऑडीट पॅनेल पुणे शहर २ यांच्या पॅनेलवरील श्री. बाळासाहेब मुळक यांची वरील कालावाधीसाठी नेमणूक करणेत यावी व त्यांना या कामाचा मेहनताना नियमानुसार अदा करण्यात यावे असे उपस्थित सभासदांनी सांगितले. सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. महेश झगडे अनुमोदक : श्री. विष्णु जगताप |
| विषय क्र. ५ | दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे. |
| ठराव क्र. ५ | दोष-दुरुस्ती अहवालाबाबत सखोल माहिती मा. सचिव यांनी समजावून सांगण्यात आली व उपस्थित सभासदांनी सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्रीमती. श्रध्दा गुरव अनुमोदक : श्री. अशोक साळुंके |
| विषय क्र. ६ | संस्थेच्या आयकर विभागाकडील थकित (टी.डी.एस.) बाबत चर्चा करुन निर्णय घेणे. |
| ठराव क्र. ६ | संस्थेच्या आयकर विभागाकडील थकित टी.डी.एस. बाबत मा. अध्यक्ष व मा. सचिव यांनी कर सल्लागार यांच्याबरोबर चर्चा करुन मा. कर सल्लागार यांनी आयकर विभागाकडील परत न मिळणारा टी.डी.एस. चा योग्य तो व्यवहार करणेत यावा असे सांगितले. अशी माहिती उपस्थित सभासदांना मा. अध्यक्ष व मा. सचिव यांनी दिली. |

# प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/२५९४०/२०२३-२४/दिनांक ३१/०७/२०२३
अंतिम भुखंड क्रमांक ९९३ सब प्लॉट ३०/२, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ४११०३०.

| | |
|---|---|
| | याविषयाबाबत उपस्थित सभासदांनी साधक-बाधक चर्चा करुन सदरील विषय मान्य करण्याचे ठरले.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. अनिल जोंधळे अनुमोदक : श्री. महेश झगडे |
| विषय क्र. ७ | संस्थेचे कायम मालमत्तेबाबत चर्चा करून निर्णय घेणे. |
| ठराव क्र. ७ | संस्थेचे कायम मालमत्तेबाबत म्हणजेच सी.सी.टी.व्ही. व डी.व्ही.आर यांची विक्रीकरण्याकरिता व्यवस्थापन समिती यांना विक्री करण्याचे अधिकार देण्यात यावे व विक्रीतून येणारी रक्कम संस्थेच्या बचत खात्यामध्ये जमा करणेत यावी व त्याचा व्यवहार करणेस उपस्थित सभासदांनी मान्यता दिली.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. तुषार ब्रह्मे अनुमोदक : श्रीमती. श्रध्दा गुरव |
| विषय क्र. ८ | मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे. |
| ठराव क्र. ८ | मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांबाबत सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना परवानगी दिली त्यात प्रामुख्याने सभासदांचे भाडेकरार संपुष्टात येत असल्याने विकसकाकडून नविन सदनिकेचा ताबा सभासदांना कधी मिळणार आहे याबाबत व्यवस्थापक समितीने विकसकाबरोबर बैठक घेण्यात येईल असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. विष्णु जगताप अनुमोदक : श्री. महेश झगडे |

प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था मर्या.

अध्यक्ष सचिव खजिनदार